आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२२ सप्टेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- सर्वसमावेशक आणि समृद्ध हिंद - प्रशांत क्षेत्र हा क्वाड संघटनेचा प्राधान्यक्रम असल्याचं परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- कर्करोग मूनशॉट उपक्रमासाठी साडेसात दशलक्ष डॉलर आणि ४० दशलक्ष लस मात्रा देण्याची प्रधानमंत्र्यांची घोषणा

- पुण्यातल्या खासगी कंपनीत काम करणाऱ्या मुलीच्या आत्महत्या प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून दखल

- श्रीलंकेत राष्ट्रपती पदासाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी सुरू, अनुरा कुमारा दिसानायके आघाडीवर

**आणि**

- पहिल्या क्रिकेट कसोटी सामन्यात बांगलादेशावर २८० धावांनी विजय मिळवत भारताची मालिकेत १-० अशी आघाडी

**<><><><><><>**

मुक्त, खुलं, सर्वसमावेशक आणि समृद्ध हिंद - प्रशांत क्षेत्र हा क्वाड संघटनेचा एक सामायिक प्राधान्यक्रमावरचा विषय आहे, आणि त्यासाठी सर्व सदस्य देश वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल अमेरिकेत डेलावेर इथं झालेल्या क्वाड देशांच्या शिखर परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करताना बोलत होते.

सध्या जग तणाव आणि संघर्षानं वेढलेलं असताना ही परिषद होत आहे, अशावेळी क्वाड सदस्य देशांनी सामायिक लोकशाही मूल्यांच्या आधारावर एकत्र काम करणं संपूर्ण मानवतेसाठी खूप महत्वाचं असल्याचं ते म्हणाले.  एका संघटनेच्या माध्यमातून एकत्र येणं याचा अर्थ कोणाच्याही विरोधात जाणं नाही, त्याउलट एकत्र येत काम करण्याचा अर्थ हा, नियमाधारित आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर आणि सर्व समस्यांचे शांततापूर्ण निराकरण करण्याला पाठबळ देणं असं आहे, असं ते म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी क्वाड संघटनेनं आरोग्य, सुरक्षा, अत्यावश्यक आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, हवामान बदल आणि क्षमतावृद्धी सारख्या क्षेत्रांसाठी केलेल्या उपायोजनात्मक नियोजनाचा उल्लेख केला. २०२५ मध्ये क्वाडची शिखर परिषद भारतात होणार असल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला.

दरम्यान  क्वाड ही जागतिक कल्याणासाठीची शक्ती असल्याचं एकमत सर्व सदस्य देशांनी व्यक्त करत, काल या शिखर परिषदेचा समारोप झाला.

यावेळी सर्व सदस्य देशांच्या नेत्यांनी एकमतानं हिंद - प्रशांत क्षेत्रासह संपूर्ण जागतिक समुदायाच्या विकासाला प्राधान्य देणाऱ्या अनेक घोषणा केल्या. याअंतर्गत क्वाड कॅन्सर मूनशॉट उपक्रम, भारत प्रशांत क्षेत्रात भागधारकांना संसाधनं पुरवण्यासाठीचा मैत्री हा उपक्रम तसंच सागरी प्रशिक्षणासह इतर महत्वाच्या उपक्रमांचा यात समावेश आहे.

दरम्यान डेलावेर इथली क्वाड शिखर परिषद आणि इतर कार्यक्रम आटोपून प्रधानमंत्री न्यूयॉर्कला रवाना झाले आहेत. ते आज एका कार्यक्रमात भारतीय समुदायाला  संबोधित करणार आहेत.

<><><><><><>

क्वाड शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी सर्व सदस्य देशांच्या प्रमुख नेत्यांच्या भेटी घेतल्या. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन बायडेन यांच्या डेलावेर इथल्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी भारत आणि अमेरिकेतल्या सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यासाठीच्या नव नव्या संधींवर चर्चा केली.

ही चर्चा अत्यंत फलदायी ठरल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून सांगितलं.

जपानचे प्रधानमंत्री फुमियो कीशीदा आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिज यांच्याशी देखील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली.

**<><><><><>**

लस निर्मिती आणि लसीकरणासाठी जागतिक आघाडी आणि क्वाड उपक्रमाअंतर्गत कर्करोग मूनशॉट उपक्रमामध्ये भारत, साडेसात दशलक्ष डॉलर्सचं, आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी ४० दशलक्ष लस मात्रांचं योगदान देईल अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. क्वाड शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर डेलावेर इथं आयोजित कर्करोग मूनशॉट उपक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. सहज उपलब्ध होऊ शकेल अशी आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्याबद्दल क्वाड समुह देशांच्या सामायिक निर्धार अशा उपक्रमातून प्रतिबिंबित होत असल्याचं ते यावेळी म्हणाले. या उपक्रमासाठी भारत आपला अनुभव आणि कौशल्य परस्परांसोबत सामायिक करायला इच्छुक आहे असं म्हणत, या उपक्रमाकरता रोग निदान संच देण्याची घोषणाही त्यांनी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या निमित्तानं भारतातून चोरीला गेलेल्या किंवा तस्करी झालेल्या २९७ पुरातन वस्तू अमेरिका भारताला परत करणार आहे. लवकरच या वस्तू भारतात परत आणल्या जातील. डेलावेर इथं झालेल्या द्विपक्षीय बैठकीवेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांना यातल्या काही वस्तू दाखवण्यात आल्या. या वस्तू परत केल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी बायडेन यांचे आभार मानले.

<><><><><>

भारत २०२७ पर्यंत जगातली तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर असून देशाचा विकास दर सात टक्क्यांच्या आसपास राहील, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सांगितलं. लाओस इथं आयोजित १२ व्या पूर्व आशियाई देशांच्या अर्थमंत्र्यांच्या शिखर

परिषदेत ते काल बोलत होते. पूर्व आशिया समिट फोरम बळकट करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचा गोयल यांनी पुनरुच्चार केला.

<><><><><>

वर्ल्ड फूड इंडिया २०२४ या चार दिवसीय महामेळाव्याचा समारोप आज नवी दिल्ली इथं होत आहे. या मेळाव्याला १९ सप्टेंबरपासून भारत मंडपम इथं सुरुवात झाली होती. जवळपास ९० देश, २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, १८ केंद्रीय मंत्रालय आणि इतर सरकारी संस्था या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. हा कार्यक्रम अन्नप्रक्रियेतील जागतिक केंद्र म्हणून भारताच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकतो. यात अन्न प्रक्रिया क्षेत्रातील नावीन्य, तंत्रज्ञान आणि स्थैर्य यातल्या महत्त्वपूर्ण बदलांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. उद्घाटन समारंभाला अन्न

प्रक्रिया मंत्री चिराग पासवान आणि अन्न व सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते.

<><><><><><>

महाराष्ट्रात पुण्यातल्या एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या मुलीनं अतिरीक्त कामाच्या दबावाला कंटाळून आत्महत्या केली होती. या घटनेची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. याप्रकरणी श्रम आणि रोजगार मंत्रालयाने तपास करून चार आठवड्यात अहवाल द्यावा, अशी सूचना आयोगानं केली आहे. पीडित मुलगी केरळची रहिवासी असून ती कंपनीत चार्टड अकाऊंट म्हणून कार्यरत होती.

या घटनेवर मानवाधिकार आयोगानं चिंता व्यक्त करत खासगी कंपन्यांमध्ये जागतिक मानवी हक्क अधिकारांचं योग्य पद्धतीनं पालन केलं जात आहे की नाही याचा आढावा घेण्याच्या सूचनाही श्रम आणि रोजगार मंत्रालयाला केल्या आहेत.

<><><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये आरएस पुरा इथं सीमावर्ती भागात घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांचा प्रयत्न सीमा सुरक्षा दलानं काल रात्री हाणून पाडला. या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात हत्यार आणि दारूगोळा जप्त केला.

आरएस पुरा इथल्या सीमा भागात काल रात्री दहशतवादी भारतीय हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करत होते. गस्तीवरील बीएसएफ जवानांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी दहशतवाद्यांचा प्रयत्न उधळून लावला. दहशतवाद्यांना रोखण्यासाठी गोळीबार केल्याची माहिती बीएसएफच्या प्रवक्त्यानं दिली. आज सकाळी या भागाची तपासणी केली असता रायफल, दोन बंदुका आणि मोठ्या प्रमाणात बंदुकीच्या गोळ्या जप्त केल्याचंही प्रवक्त्यानं सांगितलं.

**<><><><><><>**

बिहारमध्ये गेल्या काही दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. सुल्तानगंज आणि रतनपूर स्थानकांदरम्यान रेल्वे रुळांवर पाणी आल्यानं या मार्गावरील रेल्वे वाहतूक स्थगित करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यापासून गंगा नदीच्या पाणी पातळीत सातत्यानं वाढ होत आहे.

गंगा आणि अन्य नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असल्यानं पटणा, वैशाली आणि बेगूसराय यांसह १२ जिल्ह्यांत पूर आला आहे. याचा फटका १० लाखांहून अधिक नागरिकांना बसला आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काल पटणा आणि वैशाली या पूरग्रस्त भागाचा दौरा केला.

**<><><><><><>**

उत्तरप्रदेशातल्या कानपूर इथं एका गादी निर्मिती करणाऱ्या कारखान्यात काल लागलेल्या आगीत सहा जणांचा मृत्यू झाला. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्यामुळे कारखान्याचं छत कोसळलं. अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली. पण यात मोठं आर्थिक नुकसान झालं आहे.

**<><><><><><>**

श्रीलंकेत राष्ट्रपती पदासाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी कडक बंदोबस्तात सुरू आहे. सुरुवातीच्या आकडेवारीनुसार एनपीपी चे उमेदवार अनुरा कुमारा दिसानायके ४४ टक्के मतं मिळवून आघाडीवर आहेत, तर त्यांचे प्रतिस्पर्धी साजिथ प्रेमदासा ३० टक्के मतं मिळवून दुसऱ्या क्रमांकावर आहेत. अशी माहिती

श्रीलंकेच्या निवडणूक आयोगानं दिली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून श्रीलंकेत आज संचारबंदी लागू करण्यात आली होती.

**<><><><><><>**

चेन्नई इथं झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं बांग्लादेशावर २८० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. विजयासाठी ५१५ धावांचा पाठलाग करत असलेल्या बांग्लादेशाचा दुसरा डाव, आज सामन्याच्या चौथ्या दिवशी पहिल्या सत्रातच २३४ धावांत आटोपला.

भारताचा गोलंदाज आर. अश्विन यानं दुसऱ्या डावात बांग्लादेशाचे ६ गडी बाद केले.

मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना येत्या २७ सप्टेंबरला कानपूर इथं होणार आहे.

**//<><><><><><>//**